

अलिबाग : पोलिस हुतात्मा दिनानिमित्त सोमवारी मुख्यालयात अभिवादन करण्यात आले.

# पोलिस हुतात्मा दिन साजरा

अलिबाग : पोलिस हुतात्मा दिनानिमित्ताने सोमवारी (ता. २१) सकाळी रायगड जिल्हा पोलिस मुख्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. निवडणूक बंदोबस्ताचा व्यस्त दिनक्रम असतानाही या कार्यक्रमात निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांसह त्यांचे कुटुंबीय, पोलिस कर्मचारी यांची लक्षणीय उपस्थिती होती. रायगड पोलिस मुख्यालय कवायत मैदान येथे हा कार्यक्रम झाला. शहीद स्मारकास रायगडचे पोलिस अधीक्षक अनिल पारस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत पुष्पचक्र अर्पण करून सलामी देण्यात आली. या वेळी जिल्हा शल्यचिकित्सक अजित गवळी, उपविभागीय पोलिस अधिकारी सोनाली कदम, वाहतूक शाखेचे निरीक्षक एस. एच. वऱ्हाडे, सहायक पोलिस निरीक्षक अजित साबळे यांच्यासह प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.